# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

।। सामान्य प्रशासन विभाग ।।


जा.क्र.मनपा/सा.प्र./ ४९६ /२०२१ - २२ दि. ०९/ ११ /२०२१

## //सुधारित परिपत्रक //

**विषय :-** दि. 10/11/2021 व दि. 11/11/2021 रोजी आयोजित होणारा छठपुजा हा सण मर्यादीत स्वरूपात साजरा करण्याबाबत.

**संदर्भ :-** 1. परिपत्रक क्र. मनपा/ सा.प्र/487/2021-22 दि.08/11/2021

2. शासनाचे परिपत्रक क्र. आरएलपी-1021/प्र.क्र.253/विशा 1 ब दि. 03/11/2021.

छटपुजा ही समुद्र, तलाव, नदी किनारी सुर्यास्त व सुर्योदयाच्या कालावधी दरम्यान उत्तर भारतीय जनसमुदाया मार्फत केली जाते. परंतु सदयस्थितीत मिरा भाईंदरमध्ये कोविड-19 मुळे उभ्दवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता या वर्षी छटपुजा हा सण मर्यादीत स्वरूपात साजरा करण्याबाबत शासनाने संदर्भ क्र.2 अन्वये सुचना दिल्या आहेत त्यानुसार सुधारीत मार्गदर्शक सुचना खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

1. मिरा भाईंदरमध्ये ऑक्टोबर 2021 महिन्यात 696 ती 08 नोव्हेंबर 2021 पर्यत 117 कोविडचे रूग्ण आढळून आले आहेत. कोविडच्या तीसऱ्या लाटेची संभावना असल्यामुळे गर्दी टाळण्यासाठी सर्व सण हे मर्यादीत स्वरूपात साजरे करणे गरजेचे आहे.
2. समुद्रकिनारी छटपुजेस होणारी गर्दी लक्षात घेता कोविड-19 मार्गदर्शक तत्वांचे विशेषत: सामाजिक अंतर राखणे इ. चे पालन होणार नाही, त्याअनुषंगाने समुद्रकिनारी सामूहिक छटपूजेचे आयोजन टाळावे व छटपुजा उत्सवासाठी समुद्र किनारी भाविक जमा होणार नाही याची पोलीस विभागाने दक्षता घ्यावी.
3. विभाग स्तरावर छटपुजेच्या सोयीसाठी खालील प्रमाणे कृत्रिम तलावांचे नियोजन करणेत आले आहे.

- कृत्रिम तलाव बांधण्याची व बुजविण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहिल.

4. 1. सुभाषचंद्रबोस मैदान भाईंदर (प.), 2. नवघर, एस.एन. कॉलेज समोर भाईंदर (पु) , 3. शिवार गार्डन मागे मिरा रोड (पू) , 4. जोगर्स पार्क मिरा रोड (पू) या ठिकाणी छठपूजा उत्सवा करीता मिरा भाईंदर महानगरपालिकेने कृत्रिम तलावाची निर्मिती केलेली आहे सदर ठिकाणी मास्कचा वापर आणि सोशल डिस्टन्सींगचे पालन करावे, जेणेकरून कोरोनाचा संसर्ग/संक्रमण वाढणार नाही.

5. छटपुजेच्या ठिकाणी सामाजिक अंतर ठेवणे शक्य व्हावे म्हणून समुदाय संख्या मर्यादेचे खालील प्रमाणे नियोजन करावे-
   - खुल्या प्रांगणामध्ये होणाऱ्या सोहळयासाठी क्षमतेच्या 50 टक्के परंतु जास्तीत जास्त 200 व्यक्ती हि मर्यादा असेल.
   - बंदिस्त कार्यालयामध्ये होणाऱ्या सोहळयासाठी क्षमतेच्या 50 टक्के परंतु जास्तीत जास्त 100 व्यक्ती हि मर्यादा असेल.
   - या ठिकाणी सामाजिक अंतर ठेवणे शक्य व्हावे म्हणून दक्षता घ्यावी तसेच मास्कचा वापर योग्य रित्या होत असल्याची खबरदारी घ्यावी.
6. कृत्रिम तलावाच्या ठिकाणी भाविकांची गर्दी जमू नये तसेच कोविड सदृष्य वर्तणूकीचे पालन व्हावे यासाठी स्थानिक पातळीवर पोलीस विभागाची मदत घेण्यात यावी, तसेच भाविकांना फक्त पूजेसाठी परवानगी दयावी. कोविड लसीचे 2 डोस पुर्ण झालेल्या नागरीकांनाच सामुहीक स्थळी पुजेमध्ये सहभागी होता येईल.
7. छटपुजा आयोजीत करण्यात आलेल्या ठिकाणी निर्जंतुकीकरणाची तसेच थर्मल स्क्रीनिंगची पर्याप्त व्यवस्था वैदयकिय आरोग्य विभागामार्फत करण्यात यावी व वैदयकिय आरोग्य विभागाने जबाबदारी सांभाळावी.
8. कृत्रिम तलावाच्या ठिकाणी विभाग स्तरावर कोविड-19 करीता वैदयकीय पथक ठेवण्यात यावे व आवश्यकतेनुसार भाविकांची चाचणी (Antigen / PCR Testing) करण्यात यावी. तसेच लसीकरण मोहिमेमध्ये सामिल होण्यासाठी जनजागृती करण्यात यावी. यासोबतच आवश्यक तेथे लसीकरण कॅम्प लावण्यात यावेत.
9. कृत्रिम तलावाच्या ठिकाणी निर्माल्य कलश ठेवण्यात यावे. वातावरण व जल प्रदुषण रोखण्यासाठी, भाविकांनी निर्माल्य अथवा पुजेचे साहित्य पाण्यात न टाकता सदर कलशाचा वापर करावा.

10. सदर परीसरात ध्वनि प्रदुषण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

11. तसेच संदर्भ क्र. 2 मधील शासनाने निर्गमित केलेल्या छटपूजा, 2021 मार्गदर्शक सूचनांचे अनुपालन करावे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत,**

1. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
2. मा. पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
3. मा. राज्यमंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
4. मा. महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका.
5. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
6. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
7. मा. पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, मिरा- भाईंदर वसई-विरार.
8. मा. जिल्हाधिकारी, जि. ठाणे.
9. मा. उपमहापौर/मा. सभापती, स्थायी समिती/ मा. सभागृह नेता/ मा. विरोधी पक्ष नेता/ सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
10. स्वीय सहाय्यक, आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
11. उपायुक्त (सर्व) यांचेकडे माहितीसाठी.
12. सर्व सहा. आयुक्त / सर्व विभागप्रमुख यांना माहितीसाठी.
13. मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी.